आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१ सप्टेंबर २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

जपान आणि चीनचा दौरा आटोपून प्रधानमंत्री मायदेशी दाखल

उद्यापर्यंत मुंबईतले रस्ते मोकळे करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे मराठा आंदोलकांना आदेश, न्यायालयाच्या आदेशाचं पालन करण्याच्या जरांगे यांच्या सूचना

पेट्रोलमधलं इथेनॉलचं प्रमाण २० टक्क्यांपर्यंत वाढवण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

आणि

मुंबईत चांदीचे दर किलोमागे सव्वा लाख रुपयाच्या पुढे, शेअर बाजारातही तेजी

**<><><><>**

जपान आणि चीनचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत दाखल झाले.

त्यापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात आज चीनमधे तियेनजिन इथं द्विपक्षीय चर्चा झाली. ऊर्जा तसंच आर्थिक क्षेत्रात असलेल्या द्विपक्षीय संबंधामुळे सातत्याने होणाऱ्या प्रगतीबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केलं. युक्रेनमधील संघर्षासह अनेक प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही चर्चा झाली.

भारत  आणि रशिया कठीण काळातही नेहमी खांद्याला खांदा लावून उभे राहिले आहेत, जागतिक शांतता, स्थैर्य आणि समृद्धीसाठी दोन्ही देशांमधे घनिष्ठ संबंध असणं गरजेचं आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**-- होल्ड - प्रधानमंत्री बाइट - -**

**<><><><>**

चीनमधे तिएनजीन इथं सुरू असलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीनंतर तिएनजीन जाहीरनामा प्रसिद्ध  झाला. त्यात भारताच्या प्रादेशिक सहकार्य आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या योगदानाची दखल घेण्यात आली आहे. तसंच यात दहशतवादाविरोधात स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला असून या हल्ल्यात मरण पावलेल्यांच्या

प्रियजनांप्रति सहवेदना व्यक्त केल्या आहेत. हल्ला घडवून आणणाऱ्यांना जबाबदार धरायला हवं अशी स्पष्ट भूमिका घेऊन सर्व सदस्य देशांनी दहशतवादाविरोधात लढाईप्रति वचनबद्ध असल्याचं सांगितलं.

**<><><><>**

देशभरातल्या शेतकऱ्यांच्या तक्रारी नोंदण्यासाठी तसंच त्या तक्रारींचं तात्काळ निवारण करण्यासाठी एक समर्पित पोर्टल विकसित करण्याचे निर्देश केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज संबंधित अधिकाऱ्यांना दिले. ते कॉल सेंटर तसंच इतर पोर्टलद्वारे प्राप्त होणाऱ्या शेतकऱ्यांच्या तक्रारींच्या निवारणाबाबत आढावा घेण्यासाठी आज नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत बोलत होते. शेतकऱ्यांच्या समस्यांचं निवारण करण्यात विलंब होता कामा नये. त्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी जबाबदारीपूर्वक तसंच पारदर्शक पणे काम करणं आवश्यक आहे. त्यातूनच शेतकऱ्यांचं हित साधलं जाईल, असं चौहान यावेळी म्हणाले.

यावेळी त्यांनी देशभरात झालेल्या अतिवृष्टीचा तसंच त्यामुळं झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचा आढावा घेतला. ते लवकरच पंजाबला भेट देणार असून बाधित शेतकऱ्यांच्या गाठीभेटी घेणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

मराठा आरक्षण आंदोलकांनी उद्यापर्यंत मुंबईतले रस्ते मोकळे करावे आणि परिस्थिती सामान्य करावी असे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहे. आंदोलनाच्या संदर्भात दाखल जनहित याचिकेवरच्या सुनावणी दरम्यान न्यायालयानं हे आदेश दिले. ५ हजार आंदोलकांसह आझाद मैदानात आंदोलन करण्याची परवानगी दिली असताना सुद्धा आंदोलक सीएसएमटी, मरीन ड्राइव्ह, उच्च न्यायालय परिसरात गोंधळ घालत असल्याबद्दल न्यायालयानं तीव्र नाराजी व्यक्त केली. मुंबईत आणखी मराठा आंदोलक येणार नाही तसंच गरजेनुसार मनोज जरांगे यांना वैद्यकीय मदत मिळेल याची खबरदारी घेण्याचे आदेशही न्यायालयानं सरकारला दिले आहेत. आंदोलकांसाठी वानखेडे किंवा ब्रेबॉर्न स्टेडियम खुले करुन देण्याची जरांगे यांच्या वकीलांची मागणी न्यायालयानं फेटाळली आहे. याप्रकरणी उद्या सुनावणी होणार आहे.

दरम्यान, मराठा आंदोलकांनी न्यायालयाच्या आदेशाचं पालन करावं आणि रस्त्यावर फिरणं थांबावं असे आदेश मनोज जरांगे यांनी संध्याकाळी आंदोलकांना दिले आहेत.

**<><><><>**

मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याकरता हैदराबाद आणि सातारा गॅझेटियरच्या अंमलबजावणीच्या संदर्भात शासन आदेश काढण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत मराठा आरक्षणाच्या संदर्भातल्या मंत्रीमंड़ळाच्या उपसमितीची बैठक मुंबईत झाली. त्यात यासंदर्भातल्या मसुद्यावर चर्चा झाल्याची माहिती समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी वार्ताहरांना दिली. महाधिवक्ता विरेंद्र सराफ यांनी या मसुद्याला मंजुरी दिल्यावर पुढे कारवाई करू असं विखे-पाटील म्हणाले.
यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले…

- **- होल्ड - मुख्यमंत्री - -**

दरम्यान, गरीब मराठा समाजाला आरक्षणाचा हक्क मिळवून दिला पाहिजे, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे.

**<><><><>**

ओबीसीमधे नवा वाटेकरी नको अशी मागणी घेऊन ओबीसी राज्यभरात उपोषण करण्याचा इशारा ओबीसी नेते आणि राज्य सरकारमधले मंत्री छगन भुजबळ यांनी दिला. ओबीसी नेत्यांच्या बैठकीनंतर ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. ज्या हैदराबाद गॅझिटियरच्या आधारे मनोज जरांगे ओबीसीमधून आऱक्षणाची मागणी करत आहेत, त्या गॅझिटियरमधे मराठा आणि कुणबी अशा दोन जातींची स्वतंत्र नोंद आहे. त्यामुळे मराठा हे कुणबी नाहीत हे सिद्ध होतं, असा दावा भुजबळ यांनी केला.

**<><><><>**

संवाद साधण्यात अडचणींना सामोरं जात असलेल्या नागरिकांसाठी अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त साधनांचा वापर करण्याचं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. म्हैसूर मधल्या All India Institute of Speech and Hearing च्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

<><><><>

पेट्रोलमधे इथेनॉलचं प्रमाण २० टक्केपर्यंत वाढवण्याला परवानगी देण्याच्या केंद्रसरकारच्या धोरणाला आव्हान देणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. पेट्रोलमधे इथेनॉल मिसळण्याचा निर्णय सरकारने सर्वंकष विचार करुन घेतला असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार असल्याचं  सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या पीठाने सांगितलं.

इथेनॉलचं प्रमाण २० टक्के पर्यंत वाढवल्यास अनेक वाहनांच्या इंजिन कार्यक्षमतेवर परिणाम होत असल्यानं इथेनॉलविरहित किंवा १० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोलचा पर्याय उपलब्ध असावा, अशी मागणी याचिकेत केली होती. ती न्यायालयाने फेटाळली आहे.

<><><><>

बिहारच्या मसुदा मतदार याद्यांबाबतचे दावे, हरकती आणि दुरुस्त्या आजची मुदत संपल्यानंतरही दाखल करता येतील, मात्र याद्या अंतिम झाल्यावरच त्यांचा विचार करता येईल, असं निवडणूक आयोगानं आज सर्वोच्च न्यायालयाला सांगितलं. बिहारच्या विशेष मतदार याद्या पुनरीक्षणासंदर्भातली सुनावणी न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या पीठासमोर झाली. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात निवडणुकीचे अर्ज दाखल करायच्या शेवटच्या दिवसापर्यंत दावे आणि हरकती दाखल करता येतील, असंही आयोगानं न्यायालयाला सांगितलं.

<><><><>

केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गेमिंग क्षेत्राच्या प्रतिनिधींची भेट घेतली आणि नव्या गेमिंग कायद्याच्या परिणामांबाबत चर्चा केली. कौशल्याधारित ई-स्पोर्ट्स आणि ऑनलाइन सामाजिक खेळांना चालना द्यायच्या सरकारच्या प्रयत्नांवर प्रामुख्याने चर्चा झाली. आर्थिक देवाणघेवाणीशी संबंधित असलेल्या सगळ्या ऑनलाइन गेम्सवर या कायद्यानं बंदी आणली आहे.

<><><><>

मुंबईतल्या बाजारपेठेत आज चांदीचे दर सव्वा लाखाच्या पुढे गेले. शुक्रवारच्या तुलनेत चांदी किलोमागे सव्वा ५ हजार रुपयांनी वधारली आणि जीएसटीसह १ किलो चांदी १ लाख २६ हजार रुपयांपेक्षा अधिक दरात उपलब्ध होती. सोन्याच्या दरात सुमारे

एकवीसशे रुपयांची वाढ झाली. त्यानंतर २४ कॅरेट आणि २२ कॅरेट सोनं सुमारे १ लाख ७ हजार रुपये दराने विकले जात होते.

आर्थिक विकास दरात दिसून आलेली मोठी वाढ आणि शांघाय सहकार्य संघटनेनं जारी केलेलं संयुक्त निवेदन यांचा सकारात्मक परिणाम देशाच्या शेअर बाजारांवर दिसून आला. त्यामुळं सेन्सेक्स ५५५ अंकांनी वधारून ८० हजार ३६४ अंकांवर तर निफ्टी १९८ अंकांची तेजी नोंदवून २४ हजार ६२५ अंकांवर बंद झाला. माहिती तंत्रज्ञान, वाहन उद्योगांचे समभाग आज चांगले वधारले.

**//<><><><>//**